**<u>ठळक बातम्या</u>**

- संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जागतिक गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन

- किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षे पूर्ण, प्रधानमंत्री आज १९ वा हप्ता जारी करणार

- महिला शांती सैनिकांसाठीची पहिली परिषद आजपासून दिल्लीत सुरू

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय

**आणि**

- ज्येष्ठ साहित्यिक आणि वृत्त निवेदक अनंत भावे अनंतात विलिन

**<><><><><>**

भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं.  मध्यप्रदेशात भोपाळ इथं आज जागतिक गुंतवणूकदार परिषदेचं उद्घाटन त्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारत ही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असं जागतिक बँकेपासून सर्व महत्वाच्या संस्थाचं म्हणणं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड मोदी बाईट**

जगाला भारताबद्द्ल वाटणाऱ्या खात्रीमुळे देशाचा आत्मविश्वास वाढला आहे, विकसित भारतात वस्त्रोद्योग, पर्यटन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांना महत्व आलं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.  या तीनही क्षेत्रात सरकारनं परंपरिक कौशल्यावर भर देतानाच नवीन क्षेत्रानांही प्राधान्य दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. प्रधानमंत्र्यांनी यावेळी मध्यप्रदेशच्या औद्योगिक धोरणाचंही उद्घाटन केलं. खनिज संसाधने आणि पायाभूत

सुविधा असलेलं मध्यप्रदेश हे राज्य देशातल्या अग्रस्थानी असणाऱ्या राज्यांपैकी एक आहे अशी प्रशंसा करत त्यांनी मध्यप्रदेशात गुंतवणूक करायला हा काळ सर्वोतम असल्याचं नमूद केलं. भोपाळ इथं आजपासून सुरु झालेल्या जागतिक गुंतवणूकदार परिषदेत वैद्यकिय उपकरणे, कौशल्य वृद्धी, पर्यटन, MSME सह विविध विषयांवर चर्चासत्रं आणि विशेष सत्र होणार आहेत. प्रधानमंत्र्यानी काल मध्यप्रदेशातल्या बागेश्वर धाम वैद्यकीय आणि संशोधन संस्थेची पायाभरणी केली.

<><><><>

देशातील शेतकऱ्यांना निधी आणि सन्मान देणाऱ्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षं पूर्ण झाल्याबद्द्ल प्रधानमंत्र्यांनी देशातल्या शेतकऱ्यांचं अभिनंदन केलं आहे. या योजनेतून आतापर्यंत साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले याबद्द्ल प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात समाधान व्यक्त केलं आहे. गेल्या दहा वर्षात सरकारच्या प्रयत्नांमुळे कृषीक्षेत्राचा झपाट्याने विकास झाला. शेतीसाठीचा खर्च कमी झाला आणि उत्पन्न वाढलं असं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. दुसऱ्या एका संदेशात त्यांनी देशाला शेतकऱ्यांचा अभिमान असल्याचं सांगत शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारायला सरकार वचनबद्ध असल्याचं म्हटलं आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त प्रधानमंत्री आज बिहारमध्ये भागलपूर जिल्ह्यात या योजनाचा १९वा हप्ता जारी करतील. हा कार्यक्रम देशभरातल्या कृषी विज्ञान केंद्रात दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून आयोजित केला जाईल. त्यामध्ये अडीच कोटी शेतकरी प्रत्यक्ष तसंच दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित रहातील.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी आसाममध्ये गुवाहाटी इथं पोहोचतील. त्यांच्या दोन दिवसीय आसाम दौऱ्यात ते उद्या ॲडवान्टेज आसाम 2.0 या गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा परिषदेचं उद्घाटन करणार आहेत.

<><><><><>

भारत-फ्रान्स संरक्षण सहकार्याला बळकटी देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आजपासून फ्रान्सच्या चार दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना होणार आहेत. फ्रान्सचे लष्करप्रमुख जनरल पियर शिल यांच्याशी पॅरिसमधील लेस इनव्हॅलिड्स इथं चर्चा करण्यापूर्वी लष्करप्रमुखांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात येणार आहे. दोन्ही देशांमधील लष्करी संबंध दृढ करणं हा या बैठकीचा उद्देश आहे. उद्या, जनरल द्विवेदी मार्सेलला जाणार असून तिथं ते फ्रेंच सैन्याच्या तिसऱ्या विभागाला भेट देतील. पहिल्या महायुद्धात हुतात्मा झालेल्या भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ लष्करप्रमुख द्विवेदी न्यूव्ह चॅपल इंडियन वॉर मेमोरियलला भेट देणार आहेत. इकोल डी गुएरे या फ्रेंच महाविद्यालयामध्ये त्यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं आहे.

<><><><><>

नव्यानं स्थापन झालेल्या दिल्ली विधानसभेचं पहिलं अधिवेशन आज सुरू झालं. पहिल्या दिवशी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंत्री परवेश वर्मा, आशीष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, कपिल मिश्रा, रविंद्र इंद्राज सिंग आणि पंकज सिंग यांच्यासह सदस्यत्वाची शपथ घेतली. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष अरविंदर सिंग लवली यांनी सर्वांना शपथ दिली. आज दुपारी विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना सभागृहाला उद्या संबोधित करणार आहेत. मागच्या सरकारच्या कार्यपद्धतीचा अहवाल उद्याच सादर केला जाईल. २७ फेब्रवारी रोजी या अधिवेशनाची सांगता होईल.

<><><><><>

प्राप्तिकर विधेयक २०२५ चं परीक्षण करणाऱ्या लोकसभेच्या निवड समितीची बैठक आज नवी दिल्लीत सुरू आहे. ३१ सदस्यांच्या या समितीचे अध्यक्ष भाजपा खासदार बैजयंत पांडा हे आहेत. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी

समिती आपला अहवाल लोकसभेत सादर करेल. प्राप्तिकर विषयक कायद्यात सुधारणा करणं हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळाच्या यादीत समावेश करण्यासाठी शिवकालीन १२ गडकिल्ल्यांना जागतिक वारसास्थळ समितीचं आवश्यक नामांकन मिळाल्याचं महाराष्ट्राच सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी सांगितलं. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. या किल्ल्यांचा अंतिम यादीत समावेश व्हावा यासाठी सादरीकरण करण्यासाठी शेलार यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारचं शिष्टमंडळ पॅरीस इथं पोहोचलं आहे.

<><><><>

दुबईमध्ये सुरू असलेल्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारताने पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. विराट कोहलीची नाबाद शतकी खेळी आणि श्रेयस अय्यरच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतानं पाकिस्तानचं २४२ धावांचं आव्हान ४३ व्या षटकात पार केलं. सलामीवीर रोहित शर्मा २० धावा काढून बाद झाल्यानंतर शुभमन गिल आणि विराट कोहली या जोडीनं शतकी भागीदारी केली. शुभमन गिल आपल्या अर्धशतकाच्या जवळ असतानाच अब्रार अहमदच्या चेंडूवर बाद झाला. त्यानंतर विराट कोहलीनं संयमी खेळी करत श्रेयस अय्यरच्या साथीनं भारतीय संघाला विजयाच्या उंबरठ्याजवळ नेऊन ठेवलं. या सामन्याद्वारे विराट कोहलीने १४ हजार धावांचा टप्पा सर्वात कमी डावात पार केला. या विजयामुळे भारतासाठी उपांत्य फेरीचा दरवाजा उघडा झाला आहे. त्याआधी पाकिस्तानने भारतासमोर २४२ धावांचं आव्हान उभं केलं. पाकिस्तानकडून सौद शकील यानं ६२, रिझवानने ४६ आणि खुशदीलने ३८ धावा

केल्या. भारताच्या कुलदीप यादवनं ३, हार्दीक पंड्याने दोन तर हर्षित राणा, अक्सर पटेल आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी एका गड्याला तंबूत पाठवलं. भारताचा पुढचा सामना न्यूझीलंड विरुद्ध २ मार्च रोजी होणार आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक, वक्ते आणि दूरदर्शनच्या सह्याद्री या मराठी वाहिनीवरील वृत्त निवेदक अनंत भावे यांचं काल पुण्यात निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. वृत्तपत्रातील स्तंभलेखन, कथासंग्रहाबरोबरच त्यांनी विपुल प्रमाणावर बालसाहित्याचं लेखन केलं. अग्गड हत्ती तग्गड बंब, अज्जब गोष्टी गज्जब गोष्टी यासारखी अनेक पुस्तकं त्यांनी लिहिली. २०१३ मध्ये बालसाहित्यासाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला होता. त्यांच्या पार्थिव देहावर काल संध्याकाळी पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

‘शांतीरक्षक महिलाः विकसनशील राष्ट्रांचा दृष्टीकोन’ या विषयावरील महिला शांती सैनिकांसाठीची पहिली परिषद आजपासून दिल्लीत होत आहे. संरक्षण मंत्रालय आणि संयुक्त राष्ट्र शांतीरक्षक केंद्राच्या सहकार्यानं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेत विकसनशील राष्ट्राच्या ३५ शांतीसेनेच्या तुकड्यांचा सहभाग असेल. परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचं बीजभाषण होणार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता कार्यविभागाचे महासचिव जीन पियरे लॅक्रोइक्स आणि संयुक्त राष्ट्रांचे विशेष समन्वयक ख्रिश्चन सॉन्डर्स संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणार आहेत. परिषदेतल्या सहभागी महिला शांती सैनिक राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची भेट घेतील.

**//<><><><><>//**